Vol 4 Issue 8 Feb 2015 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**


Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University



**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 3.4052(UIF)
Volume-4 | Issue-8 | Feb-2015
Available online at www.aygrt.isrj.org

GRT

# *'सागर' यांच्या गझलांतील भावाविष्कार*

*शकील शेख*

सा. प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग,ता. बार्शी, जि. सोलापूर,

***सांराश :*** मराठी साहित्यात 'गझल' हा काव्यप्रकार आज दिवसेंदिवस अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागला आहे. मराठीत माधव ज्युलियन, सुरेश भट, ए. के. शेख, अजिज नदाफ, भिमराव पांचाळे, डी. एन. गांगण, संगीता जोशी, दीपक करंदीकर, बदिउज्जा बिराजदार, दिलीप पांढरपट्टे, मधुसूदन नानिवडेकर, सुधाकर कदम, श्रीकृष्ण राऊत अशा गझलकारांनी गझल लोकप्रिय केली. 'गझल' किंवा 'गज्जल' हा मूळ अरबी पद्यरचनेचा एक प्रकार असून तो अरबी भाषेतून फारशीत, फारशीतून उर्दूत आणि उर्दूमधून मराठीत आला.

## *प्रस्तावना :*

भारतात गझल हा काव्यप्रकार सूफी संतांच्यामुळे रूजला. या सूफी संतांनी आपली प्रार्थना गीते गझलमधून लिहिली. सर्वप्रथम उत्तर भारतात ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती (इ. स. ११४२-१२३६) यांनी फारशी व भारतीय भाषांमध्ये गझलची रचना केली तर दक्षिणेत विजापूरचा कवी इब्राहिम आदिलशहा (इ. स. १५३४-१५५७) याने सर्व प्रथम गझलची रचना केली.

प्राचीन व आधुनिक मराठी भाषेतील गझल या काव्यप्रकाराचे स्वरूप आणि त्याचे पुरस्कर्ते याबद्दल भारतीय संस्कृतिकोशमध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती अशी, "प्राचीन मराठी कवित मरोपंत (इ. स. १७२९-९४) आणि आधुनिक नाटककारांत किर्लोस्कर, डोंगरे, कोल्हटकर, खाडिलकर इत्यादी संगीत नाटककारांनी गज्जलाचा पुरस्कार केला आहे. पण त्यांची रचना काहीशी शिथिल झाली आहे. कवी माधव ज्युलियन (माधवराव पटवर्धन इ. स. १८९४-१९३९) यांनी मात्र फारशी भाषेचा व वृत्तांचा विशेष अभ्यास करून गज्जल रचले आहेत."

अरबी व फारशी भाषांपेक्षा उर्दू भाषेत गझलचा विकास अधिक झाला. उर्दू भाषेत मीर, गालीब, जौक यांनी बरेच गझल रचले. मीर (इ. स. १७२३-१८१०) हा तर गझलचा सम्राट मानला जातो.

गझल म्हणजे नेमके काय ? गझलचे स्वरूप कसे असते ? या गोष्टींचा विचार केल्यास गझल हा एक पद्यप्रकार आहे. अरबी पद्यरचना प्रकार मराठीत आणताना माधवराव पटवर्धन यांनी 'छंदोरचना' या ग्रंथात 'गज्जल' हा शब्द वापरला. गझल म्हणजे काय हे स्पष्ट करता सुरेश भट म्हणतात, "एकाच वृत्तातील, एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येकी २-२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझाल." एकाच वृत्तातील एकच यमक व अन्त्ययमक असलेल्या प्रत्येकी २-२ ओळी यात येणे महत्त्वाचे असते. गझलाचा उर्दू-मराठी-हिंदी शब्दकोशात दिलेला अर्थ असा, "गझल-प्रियतमेशी प्रीतीच्या व जवानीच्या गोष्टी बोलणे, प्रेमपात्राशी गुजगोष्टी करणे व खेळणे." गझल ही मनाला भूरळ घालणारी काव्यरचना आहे. गझलेचा जन्मच मुळी भावनेतून होतो, गझलाच्या माध्यमातून प्रेमभाव व्यक्त केला जातो, प्रेमाच्या गुजगोष्टी केल्या जातात. म्हणूनच सुप्रसिध्द गझलकार ऐ. के. शेख म्हणतात, "गजल म्हणजे प्रेयसीबरोबर केलेली कुजबूज." गझलमध्ये हळुवारपणा असावा लागतो, एका प्रकारची नजाकत असावी लागते.

गझलमधून प्रामुख्याने प्रियकर-प्रेयसी यांच्यातील प्रेमभाव व्यक्त होत असला, शृंगार हाच गझलचा मुख्य रस असला तरी काही गझलामधून इतरही आशय विषय येतात. सृष्टिवर्णनपर, बोधपर, ध्येयस्तुतीपर, वैराग्य, परमेश्वरभक्ती, देशभक्ती, कौटुंबिक प्रेम अशा विविध विषयांवर गझलचे लेखन झाले आहे.

कवी 'सागर' अर्थात प्रकाश रामचंद्र क्षीरसागर गझलेच्या विश्वात सुर्याचा तेजोमय प्रकाश घेऊन प्रवेश करत आहेत. 'सागर' हे मूळ सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी या गावचे, नोकरीच्या निमित्ताने ते गोव्याला गेले आणि तेथेच ते स्थायिक झाले. गोव्यात पत्रकारितेच्या बरोबर त्यांनी साहित्याचा छंद जोपासला. त्यांनी 'सदगुरू सीताराम महाराज

चरित्रामृत' (१९८६), 'गर्भावल्या संध्याकाळी' (१९९६), 'मातीचे डोहाळे' (२००७) या काव्यसंग्रहाबरोबरच 'माणसांची खैर नाही' (२०११) हा ललित लेख संग्रह आणि आता 'झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता' (२०१४) हा गझल संग्रह प्रसिध्द झाला आहे.

सागर यांनी गझल हा काव्यप्रकार आत्मसात करण्यासाठी खडतर मेहनत घेतलेली आहे. गझल ही ऐकण्यास फारच गोड वाटते, ती मनाला भूरळ पाडते पण तिची रचना करताना मात्र फारच दिव्यातून जावे लागते. या संदर्भात आपला अनुभव कथन करताना सागर म्हणतात, " 'गझल' ही मनाला भूरळ घालणारी काव्यरचना, ती ऐकण्यास जितकी गोड लागते, तितकीच तिची रचना करणे अतिकठीण. कविता करणे हे ही तितकेच कठीण त्याकरीता अनेकदा शब्दांची आराधना करावी लागते. गजल लिहिताना हाच अनुभव मला आला." सागर यांनी गझलांचा जणू ध्यासच घेतला म्हणूनच गझल त्यांचा 'श्वास' बनली. सागर यांच्या गझलांच्या आशयात विविधता आहे, त्यांच्या गझलांमधून व्यक्तिगत जीवनाची अनुभूती, सामाजिक जाणिवा, प्रेमभाव, शेतकी जीवन असे विविध आशय, विषय येतात.

***जीवनविषयक गझलांतून आलेला विचार :–***

कवी सागर यांनी आपल्या गझलांच्या माध्यमातून स्वतःच्या जीवनाविषयी व जनसामान्यांच्या जीवनाविषयी विचार मांडलेले दिसतात. सागर यांच्या मनात जनसामान्यांबद्दल कळवळा आहे, त्यांना सर्वसामान्यांच्या दुःखात सहभागी होणं, त्यांच दुःख दूर करण्यासाठी झटणं आवडतं, माणसाचं दुःख दूर करण्याचं कार्य हे ईश्वरपूजे इतकच पवित्र कार्य आहे, याची जाणिव सागर यांना आहे. त्यामुळेच ते दीन, दलित, अनवाणी व्यक्तीच्या पायात रूतलेला काटा काढून त्याच्या वेदनेवर फुंकर मारण्याचे काम करतात. माणसाच मन जेव्हा स्वच्छ असतं, तेव्हा त्याला सर्वत्र परमेश्वराचाच अस्तित्व जाणवंत. स्वच्छ अंतःकरणाचा हा कवी दीन दलितांमध्ये परमेश्वराच अस्तित्व पाहतो.

समाजात सर्वच लोक निर्मळ मनाचे नसतात चेहऱ्यावर मुखवटे लावणारे समाजात खूप असतात पण त्यांचे ते मुखवटे आयुष्यभर टिकतिलच असे नाही. मुखवटा लावून लुबाडून प्राप्त केलेले वैभव आयुष्यभर टिकत नसते. कष्टाने जे मिळते तेच आपले असते, त्यामुळे कष्टावर निष्ठा ठेवून वाटचाल केली तर एक दिवस नक्कीच आपल्यालाही वैभव प्राप्त होईल. त्यामुळे कष्ट करत रहा, इतरांचे वैभव पाहून अस्वस्थ होऊ नका. हा संदेश देताना, 'तगणार काय येथे खोटेच वागणारे' या गझलेत सागर म्हणतात,

" बघतो कशास 'सागर' तू वैभवास त्यांच्या
कष्टातूनी मिळे रे तुझा नाव शोभणारे "

कष्ट हेच भांडवल आणि कष्टातूनच वैभवाची प्राप्ती होऊ शकते हा विचार घेऊन वाटचाल करणारा हा कवी समाजाला मात्र चांगल ओळखून आहे. समाजात सज्जनाबरोबर दुर्जनांचाही भरणा आहे हे कविला पक्के माहित आहे. दुर्जन माणसं सज्जनांना सदैव त्रास देण्याचा, छळण्याचा प्रयत्न करतात, हे ही कवी जाणून आहे. म्हणूनच 'धरतोस तू अबोला आता तरी कशाला ?' या गझलमध्ये कवी म्हणतो,

" 'सागर' तुला सतावी नाठाळ भेटणारा
वादात कोपतो तू त्याच्यावरी कशाला ? "

नाठाळाशी वाद घालून त्याच्यावर रागावण्यात काहीच अर्थ नाही, ही सागर यांची भूमिका आहे. नाठाळांनाही क्षमा करण्याची संतांची वृत्ती येथे सागर यांच्या विचारातून जाणवते. परके नाठाळ बनून त्रास देतात, तेव्हा त्यांना सांभाळून घेणाऱ्या या कविला कधी-कधी आपल्या व्यक्तीनाही सांभाळून घेण्याची वेळ येते. कारण कधी-कधी आपल्या जवळच्या व्यक्तीही परक्याप्रमाणे वागू लागतात. तेव्हा कवी त्यांनाही सांभाळून घेतात. 'माझीच सर्व नाती परकी मला झाली' या गझलमध्ये सागर लिहितात,

" माझीच सर्व नाती परकी मला झाली
सांभाळणे तयांना सारी कलाच झाली "

परक्या झालेल्या जवळच्या लोकांनाही सांभाळून घेण्याची कला कविला प्राप्त झाली आहे. जवळच्या सोबत्यांना इतकं सांभाळून घेऊनही हे जवळचे सोबती शत्रू सारखे वागू लागलात. कविची सारी गुपितं फोडतात, अहित साधतात. जेव्हा भावनेला आग लागलेली असते तेव्हा त्यात तेल ओतण्याच काम ते करतात. हे सोबती संकटकाळी मदतीला येण्याऐवजी संकटात भरच घालतात. त्यामुळे 'अहित माझे साधलेले सोबत्यांनी' या गझलमध्ये सागर लिहितात,

" वेढले होतेच जेव्हा संकटांनी
युध्द आहे छेडलेले सोबत्यांनी "

सोबत्यांच्या अशा या वागण्याने कविला आत्मक्लेष होतो. कवीला वाटतं जगाला ओरडून-ओरडून सांगावं की सोबत्यांनीच माझ्याा अंतःकरणावर मोठ मोठे घाव घातले. हळूवार मनाचे सागर इथे आत्मकैफियतच रसिकांच्या समोर मांडताना दिसतात.

### *सामाजिक गझलांतून आलेला विचार :—*

सागर यांची गझल समाजाभिमुख आहे. त्यांनी समाजातील दैन्य, दारिद्र्या, दुःख, भ्रष्टाचार, माणूसपण हरवल्याची भावना आपल्या गझलांमधून व्यक्त केली आहे.

आज जगणे सुखाचे राहिले नाही पण दुःखातही हसत जगणारे लोक समाजात आहेत. जे स्वतः कष्ट करून दुसऱ्यांसाठी निवारा उभा करतात त्यांच्या डोक्यावर मात्र निवारा नाही, पण तरी ते डगमगत नाहीत. मोठ्याा निर्धाराने जीवन जगतात, जीवनाच्या प्रवासात डोक्यावर दुःखाच गाठोडं आहे आणि या दुःखाचा भार दिवसेंदिवस वाढतोच आहे. त्यामुळे आता जीवन सुखमय होईल ही अपेक्षा करणे फोल ठरते. जीवनाचा मार्ग तर पादाक्रांत केला पाहिजे. पण वाढत जाणारं हे दुःख असाह्या होणारं आहे. सागर आपल्या या दुःखाची तिव्रता 'झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता' या गझलमधून मांडताना लिहितात,

" झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता
लेऊन त्या व्रणांना गेला सजून रस्ता "

कवीच्या जीवनाला दुःख रोजच धक्के देत आहे, अशा धक्क्यातून कविला सावरता येत नाही आणि कविला सावरणाराही कोणी भेटत नाही. जग मुर्दाड बनले आहे, आपले पणाची भावना संपलेली आहे. सुखात प्रत्येक जण जवळ येतो, पण दुःखात सारेच दूर पळतात. माणसांच्या प्रवृत्तीवर भाष्य करताना 'नसतेच झाड आता' या गझलमध्ये म्हणतात,

" माझीच माणसे ही टाकून दूर जाती ।
गर्दीत भेटती मज सगळेच ह्राड आता ।"

या जगात माणसामधला बंधूभाव संपुष्टात आला आहे. प्राणीमात्रामध्ये प्रेमभाव आहे, पण माणसामध्ये नाही. माणसाच्या मनात द्वेषभाव भरून उरला आहे. संस्कृतिचा ऱ्हास होतो आहे, परंतु नव्या पिढीला त्याचे काहीही देणे घेणे नाही. ही नवी पिढी एकलकोंडी बनली आहे, ती सामाजिक रितभात विसरत चालली आहे. संस्कृतीचा होत चाललेला हा ऱ्हास पाहून सागर अतिशय दुःखी होतात. आपल्या मनातील हे दुःख 'मनाला मिळे संगतीही जनाची' या गझलमध्ये व्यक्त करताना सागर म्हणतात,

" इथे ऱ्हास होतो जुन्या संस्कृतीचा
नव्या या पिढीला तमा न तयाची ।"

पैसा हेच सर्वस्व नाही पण पैशावर प्रेम करणारी आजची पिढी पैसा एक्क पैसा हाच विचार करते. पैशावर प्रेम करणारीही पिढी हृदय शुन्य बनली आहे, पैशाच्या समोर तिला नातीगोती काही दिसेनाशी झाली आहेत. पैशासाठी ती कोणत्याही थराला जाऊ शकते. सागर बदललेल्या सामाजिक स्थितीचे चित्रण, 'भाळते आहे कुणी' या गझलमध्ये करताना म्हणतात,

" प्रेम करतो जो धनावर हृदय त्याचे कोरडे
घेऊनी धन अन सुनेला जाळते आहे कुणी "

सामाजिक परिस्थिती बदलली आहे, काल जे चोर होते ते आता साव झाले आहेत आणि त्यांचा भाव वाढून ते राव झाले आहेत. ही गोष्ट सागरना खूप व्यथित करून जाते. पण कधी-कधी मनाच्या साऱ्याच व्यथा काही बोलून दाखवता येत नाही आणि अनेकदा त्या चार चौघांना सांगूनही त्याचा काही उपयोग होत नाही.

सामाजिक स्थिती कितीही ढासळली तरी शेवटी विजय हा सत्याचाच होणार हा सागर यांचा दृढ विश्वास आहे. मात्र हा विजय सहजासहजी प्राप्त होणार नाही हे ही सागर जाणून आहे, म्हणून सागर 'पहाटे नभाचा किती थाट आता' या गझलमध्ये म्हणतात,

" सदा सत्य जिंके परि त्रास त्याला ।
असत्यास मिळतो कुठे नाट आता ? ।"

सत्याचा विजय होण्यासाठी सत्याचा मार्ग अवलंबणाऱ्याला अग्निदिव्यातून जावे लागते हे ही तितकेच खरे.

### *शेती / शेतकरीविषयक गझलांतून आलेला विचार :–*

सागर आज जरी शहरात वावरत असले तरी त्यांचे बालपण ग्रामीण भागताच गेले आहे. शेती, शेतिसंस्कृती त्यांना चांगलीच परिचित आहे, त्यामुळेच ते शेती, शेतकरी या विषयी भरभरून बोलतात. शेतकऱ्यांचे दारिद्र्या, दुःख, दैन्य आज कोणालाच दिसत नाही. जगाचा पोशिंदा आज सर्व बाजूंनी नाडला जात आहे. आर्थिकदृष्ट्याा पिचलेल्या शेतकऱ्यांची बी बियाणे घेण्याचीही ऐपत नाही, त्यात कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ. या दुष्काळी परिस्थितीने तो पार खचून गेला आहे, कर्ज बाजारी झालेला हा शेतकरी व्याजासाठी नाडवला जातो आहे. शेतकऱ्यांची ही दयनिय अवस्था 'चुकला कयास आता' या गझलमध्ये शब्दबध्द करताना सागर म्हणतात,

" कर्जात तूच 'सागर' आहे पिचून गेला ।<br>
शिरजोर व्याज मोठे नाडावयास आता ।"

शेतकरी वर्षानुवर्षे सावकाराचे कर्ज फेडतो पण कर्ज काही फिटत नाही. शेतकऱ्यांची दैना कधीही संपत नसते. एकीकडे सावकाराचा फास तर दुसरीकडे लहरी निसर्गाचा जाच तरी शेतकरी आशावादी राहतो. मिरूग कोरडा गेला तरी शेतकऱ्याला पावसाची आस असते. पण आकाशात ढग येत नाहीत, दिवसा जमीन तापते तर रात्री चांदण्यांचा खच पडतो. दुष्काळी परिस्थितीत सरकार फक्त मदतीची घोषणा करतं शेतकऱ्यांच्या पदरी काहीच पडत नाही.

कधी पाऊस पडतो, शेत पिकतं तर मालाला भाव मिळत नाही. अशा स्थितीत निराश, हताश झालेला शेतकरी आत्महत्येकडे वळतो. शेतकऱ्याच्या आत्महत्येवर भाष्य करताना 'पावसाचा आस आहे' या गझलमध्ये सागर लिहितात,

" घोषणा त्या जिरून गेल्या ऐकणारे सुन्न झाले ।<br>
पीक आले भाव गेले अन् नशीबी फास आले ।"

शेतकऱ्यांची चहू बाजूने फसवणूक होते आहे, कधी निसर्ग फसवतो, कधी सावकार फसवतो तर कधी बिल्डर फसवतो. बिल्डर शेतकऱ्यांची जमीन कवडीमोल भावाने घेतो आणि त्यावर मोठ मोठ्याा इमारती, कारखाने उभे करतो, सागर म्हणतात,

" गावातही पशूंचा संचार वाढलेला ।<br>
तू शेत बिल्डरांना देऊन टाकलेले ।"

'भारून टाकलेले' या गझलमध्ये आलेल्या या ओळीतून गावात बिल्डरांनी बसवलेले बस्तान आणि शेतकऱ्यांच्या लाटलेल्या जमिनी याविषयी विचार येतो.

### *प्रेमविषयक गझलांतून आलेला विचार :–*

कवी सागर यांच्या प्रेमविषयक गझलांमधून प्रेमिकांच्या मनाची तगमग, प्रेमातील अनावर ओढ, प्रेमीजनांनी उराशी बाळगलेली स्वप्ने अशा विविध गोष्टींचे चित्रण येते.

तारूण्याचे गीत तरूण मनाला भावते, नजरेला नजर मिळते आणि प्रेम जुळून येते. एकदा प्रेम जुळले की, प्रिय व्यक्ती सतत नजरेसमोर हवी असे वाटू लागते. प्रेमिकांना आपल्या प्रेमावर कुणाचा अंकुश, कुणाचा पहारा नको असतो.

प्रेमिकांनाच काय निसर्गालाही कुणाचा पहारा सहन होत नाही. मानवी भावभावनांचा आरोप निसर्गावर करत सागर 'नभी चांदण्यांना तमाचा पहारा' या गझलमध्ये म्हणतात,

" सदा धुंद होते कळी भृंग बसता ।<br>
तिला पण नकोसा फुलांचा पहारा ।"

प्रेमात आपल्या प्रिय व्यक्तीची चाहूल लागताच ऊर धडधडू लागते. भेटीनंतर बरच काही बोलण्याचा इरादा असतो पण भेट घडताच शब्दच फुटत नाहीत. प्रेमीजनांची ही अचूक अवस्था 'का धडाडे ऊर माझा' या गझलमध्ये शब्दबध्द करताना सागर लिहितात,

" लागता चाहूल त्याची का धडाडे ऊर माझा ? ।<br>
लाभता सहवास त्याचा अडखळे का सूर माझा ? ।"

प्रेमात कधी भेटीगाटी तर कधी विरह, विरहात आठवणीने दुःखी होणं, रडणं, वेडं होणं आलच. तो ही प्रेम वेडा, तिही प्रेम वेडी, त्यंची दुनियाच वेडी. असे हे पागल प्रेमी आपल्याच धुंदीत जगत असतात. प्रेमीजनांची ही अवस्था 'विरहामध्ये रडली पागल' या गझलमध्ये सागर शब्दबध्द करताना लिहितात,

" विरहामध्ये रडली पागल ।
प्रीतीने मुसमुसली पागल ।।
तोही पागल तीही पागल ।
दुनिया त्यांची सगळी पागल ।। "

प्रेमात धुंदीचं जिणं जरी असलं तरी वेळ काळाचं भान हे ठेवावच लागतं. वेळेच भान जर प्रेमीजनांना राहिलं नाही तर जगासमोर त्यांच हसं होऊ शकतं. आपलं हसं होऊ नये असं प्रत्येक प्रेमीनी वाटतं. म्हणूनच 'रात आहे संपली' या गझलमध्ये या प्रेमींच्या मनातील भाव व्यक्त करताना सागर लिहितात,

" चंद्र सांगे चांदणीला रात आहे संपली ।
पूर्व ही उजळून येता वात आहे संपली ।। "

प्रेमींना समाज सहजा सहजी एकत्र येऊ देत नाही. प्रेम प्राप्तीसाठी प्रेमींना अनेक दिव्यांतून जावे लागते पण सच्चे प्रेमी डगमगत नाहीत, ते साऱ्या जगाशी लढा देण्यास तयार असतात. जगाची रित आणि सच्चा प्रेमाचे स्वरूप यावर 'ही या जगाची रीत आहे' या गझलमधून 'प्रकाश' टाकताना सागर म्हणतात,

" प्रेमिकांना रडवणे ही या जगाची रीत आहे ।
झुंजणे साऱ्या जगाशी ती खरी मग प्रीत आहे ।। "

सच्चे प्रेमी आपल्या प्रेमासाठी जगाला टक्कर देतात. ते जगापासून पळ काढत नाहीत तर जगाशी झुंजत आपले प्रेम सफल करतात.

एकंदरीत सागर यांच्या गझलांचा विचार करता त्यात विविध आशय, विषय आलेले आहेत. सागर यांची गझल समकालीन समाजाचे चित्रण करते, त्यांच्या गझलांमधून जीवनविषयक दृष्टीकोन चित्रित होतो. सागर आपल्या गझलमधून शेतकऱ्यांचे दुःख मोठ्याा ताकतीने चित्रित करतात. प्रेम आणि प्रेमिजन यावर भाष्य करताना सागर यांची गझल खऱ्या प्रेमाचे स्वरूप जगासमोर मांडते.

***संदर्भ ग्रंथ***

१संपा. जोशी महादेवशास्त्री : भारतीय संस्कृतिकोश, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, चतुर्थ आवृत्ती, इ. स. २००४.
२भट सुरेश : रंग माझा वेगळा, साहित्य प्रसार केंद्र सीताबर्डी, नागपूर, आवृत्ती आठवी, २००४.
३संपा. जोशी श्रीपादः उर्दू - मराठी - हिंदी शब्दकोश, नितिन प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, १९९७.
४क्षीरसागर प्रकाश रामचंद्र (सागर): झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता, माधव राघव प्रकाशन, ताळगाव, गोवा, प्रथम आवृत्ती, २०१४.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org